


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १३०, गुरुवार १७ एप्रिल २०२५ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# खा. लंकेंनी बीएसएनएल अधिकाऱ्यांना धरले धारेवर!

## विविध सुविधांमधील त्रृटींबाबात विचारला जाब | खा. बजरंग सोनवणे यांचीही उपस्थिती

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**भारत दूरसंचार निगमच्या अधिकाऱ्यांसमवेत बुधवारी अहिल्यानगर येथे पार पडलेल्या बैठकीत खासदार नीलेश लंके यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत विविध सुविधांमधील त्रृटींबाबत जाब विचारला. यावेळी बीएसएनएलच्या केंद्रीय समितीचे अध्यक्ष खासदार बजरंग सोनवणे हे उपस्थित होते. त्यांनीही अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली.**

बैठकीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्याच्या दक्षिण लोकसभा मतदारसंघातील नगर, पारनेर, कर्जत, जामखेड, पाथर्डी, शेवगांव, श्रीगोंदे व राहुरी या तालुक्यांतील अनेक गावांमध्ये बीएसएनएल सिग्नल अत्यंत दुर्बल आहेत किंवा संपूर्णतः अनुपलब्ध आहे याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले. संबंधित गावांमध्ये बीएसएनएलचे टॉवर तातडीने उभारण्याचे निर्देश देत ग्रामीण भागात बीएसएनएलची दुरसंचार सेवा पोहचविण्यासाठी ठोस योजना तयार करण्याची सुचना खासदार नीलेश लंके यांनी केली. ग्रामीण भागात डिजिटल भारत मिशन यशस्वी करण्यासाठी दर्जेदार सेवा पुरविणे आवष्यक असल्याचे यावेळी खा. लंके यांनी सांगितले.

यावेळी खासदार बजरंग सोनवणे यांनी बीड लोकसभा मतदारसंघातील बीएसएनएल सेवांचा आढावा घेत ग्रामीण भागातील संपर्क व इंटरनेट सेवा बळकट करण्यावर भर दिला.

बैठकीस बीएसएनएलचे महाप्रबंधक राजेंद्रसिंह चोंगड, डीजीएम प्लॅनिंग एस.के. पटेल, एमजीएम ओएमसी जी.एस. जोशी, राशिनकर, दीपक जोशी विजय पिंपरकर यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.



भारत दूरसंचार निगमच्या अधिकाऱ्यांसमवेत बुधवारी अहिल्यानगर येथे पार पडलेल्या बैठकीत खा. नीलेश लंके व खा. बजरंग सोनवणे यांनी दूरसंचार सेवांसंदर्भात आढावा घेतला.

### विविध मुद्यांचा आढावा

या बैठकीमध्ये बीएसएनएलच्या एफटीटीएच फायबर कनेक्शन, मोबाईल टॉवर्सची स्थिती, कॉपर कनेक्शन व त्यावरील सेवा, नव्या मोबाईल टॉवरची आवष्यकता, प्रीपेड सेवा व कनेक्शनची उपलब्धता, दूरध्वनी केंद्र व त्यांची स्थिती, डिजिटल भारत निधीचा वापर आदी विविध मुद्यांवर चर्चा करण्यात येऊन सखोल आढावा घेण्यात आला.

### दूरसंचार मंत्रालयाशी पत्रव्यवहार करणार

आपण संसदेत जाऊन आठ महिने झाले तरी बीएसएनएल कार्यालयाकडून आतापर्यंत खासदार या नात्याने कोणतीही माहीती देण्यात आली नाही. अधिकारी भेटीसाठीही आले नाहीत. लोकप्रतिनिधींसंबंधातील शिष्टाचार न पाळणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याची टीपन्नी करत यासंदर्भात आपण केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाशी पत्रव्यवहार करणार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी यावेळी सांगितले.

# जनता दरबारातून प्रशासन व जनतेत समन्वय

## आ. काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन | पारनेर येथे जनता दरबार संपन्न

**पारनेर : प्रतिनिधी**

**जनता दरबाराच्या माध्यमातून प्रशासन व जनतेमध्ये समन्वय निर्माण होणार असून त्या माध्यमातून जनतेचे प्रश्न मार्गी लागतील असा विश्वास आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केला.**

आ. काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली पारनेरमधील इंदिरा विकास भवन येथे बुधवारी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. दरबार सुरू झाल्यानंतर तालुक्यातील नागरिकांनी आपल्या विविध समस्या आ. दाते तसेच अधिकाऱ्यांपुढे मांडल्या. या समस्या जाणून घेत त्यांचे तातडीने निराकरण करण्याचे निर्देश देण्यात आले. दर महिन्याला जनता दरबाराचे आयोजन करून नागरिकांचे प्रश्न प्रशासनाच्या माध्यमातून मार्गी लावण्याचा संकल्प यावेळी दाते यांनी केले.

यावेळी महसूल, पुरवठा, भुमिअभिलेख, पंचायत समितीतील विविध विभागाच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात आल्या. त्यापैकी काही तक्रारी तात्काळ हातावेगळ्या करण्यात आल्या तर काही तक्रारींचे निराकारण विशिष्ठ वेळेत करण्याची आश्वासन देण्यात आले.




### जनतेसाठी हक्काचे व्यासपीठ

नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन प्रशासनाच्या माध्यमातून त्यांचे निराकरण करणे हा या जनता दरबाराचा हेतू आहे. प्रत्येक महिन्याला जनता दरबाराचे आयोजन करून आम्ही जनतेजवळ राहू. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपणासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते कटीबध्द आहेत. जनता दरबारामुळे सर्वसामान्य जनतेला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले असून त्या माध्यमातून कोणावरही झालेला अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

आमदार काशिनाथ दाते
विधानसभा सदस्य

यावेळी तहसिलदार गायत्री सैंदाणे, गटविकास अधिकारी दयानंद पवार, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तर भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, जि.प.चे मा. सदस्य वसंत चेडे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, युवतीच्या तालुकाध्यक्ष अपर्णा खामकर, संदीप कपाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.पदाधिकाऱ्यांनीही नागरीकांचे प्रश्न समजावून घेत अधिकाऱ्यांच्या माध्यमातून ते दूर करण्याचे प्रयत्न केले.

# लाडकी बहीण योजना बंद केली जाणार!

## | आदित्य ठाकरे यांचा गंभीर दावा | नाशिकमध्ये ठाकरे गटाचा निर्धार मेळावा



**नाशिक : प्रतिनिधी**

**शिवसेना (ठाकरे गट) चा ''निर्धार मेळावा'' नाशिकमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यात युवासेना प्रमुख व आमदार आदित्य ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल करत लाडकी बहीण योजनेबाबत गंभीर दावा केला. ''लाडकी बहीण'' ही योजना लवकरच बंद होणार असून, त्यासाठी कोर्टाच्या माध्यमातून पद्धतशीर डाव आखण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला.**

या सरकारला सत्तेवर येऊन १०० दिवस झाले, पण अजूनही एकही चांगली योजना त्यांनी आणलेली नाही, असा सवाल करत ठाकरेंनी लाडकी बहीण योजनेच्या कपातीकडे लक्ष वेधले. ''लाडकी बहीण योजना आता ५०० रुपयांवर आली आहे. आम्ही सरकारमध्ये असतो तर महिलांना ३,००० रुपये देणार होतो. पण भाजप, शिंदे गट आणि दादांचा गट मिळून गावागावात फिरून सांगत होते की, आम्ही २,१०० रुपये देऊ. आता मात्र, हीच योजना हळूहळू बंद करण्याचा डाव सुरू आहे,'' असे ते म्हणाले.

''लाडकी बहीण योजनेतून ८ लाख महिलांना वगळण्यात आले आहे. लवकरच आणखी ५० लाख महिलांना बाहेर काढण्यात येणार आहे. काही महिलांच्या खात्यात पैसे गेलेत ते परत घेतले जात आहेत, तर काहींवर पोलिस कारवाई केली जाणार आहे. योजनेबाबत कोर्टात याचिका दाखल करून हेच लोक योजना बंद करतील,'' असा इशारा आदित्य ठाकरेंनी दिला.

दरम्यान, ठाकरेंनी बीड आणि परभणीतील महिलांवरील अत्याचार प्रकरणावरूनही सरकारवर सडकून टीका केली. ''बीडमधील 'आका' कोण आहे हे सर्व महाराष्ट्राला माहीत आहे. पण त्याचा फोटो बाहेर आल्यानंतरच मंत्रीपदाचा राजीनामा

उर्वरीत पान ३ वर

# पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आवाहन



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा कार्यक्षम वापर ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे सर्व विभागांनी समन्वय साधून सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.**

जलसाक्षरता वाढवण्यासाठी १५ ते ३० एप्रिल या कालावधीत जिल्ह्यात आयोजित 'जलव्यवस्थापन कृती पंधरवड्या'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे, अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, संतोष सांगळे आदी उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमात सर्व शासकीय विभागांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. प्रत्येक विभागाने समन्वयाने उद्दिष्टपूर्तीसाठी ठोस कार्यवाही करावी. तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनीही यात सक्रीय सहभाग घ्यावा. जिल्ह्यात उन्हाळ्यात पाणी टंचाईची समस्या वारंवार जाणवते. शेतीसाठी पाणी अत्यावश्यक असतानाही काही भागांत पाण्याचे असमान वितरण होते. त्यामुळे नागरिकांना पाण्याचे महत्त्व पटवून देणे व जलसाक्षरता वाढवणे अत्यंत गरजेचे आहे.

डॉ. आशिया पुढे म्हणाले की, जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार आणि जलयुक्त शिवार या योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. भविष्यात प्रमुख नद्यांचे पुनरुज्जीवन लोकसहभागातून करण्यावर भर दिला जाणार आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांनी गावपातळीवर

उर्वरीत पान ३ वर

# बालेकिल्ल्यातच काँग्रेसला खिंडार!

## माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षांसह १० नगरसेवकांच्या हाती भाजपचं कमळ

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीरामपूर मतदारसंघात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि १० माजी नगरसेवकांनी काँग्रेसचा हात सोडत थेट भाजपचा कमळ हाती घेतला आहे. त्यामुळे काँग्रेसचे आमदार हेमंत ओगले आणि नेते करण ससाणे यांना मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.**

१५ एप्रिल रोजी मुंबई येथील भाजप प्रदेश कार्यालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि जलसंपदा मंत्री व श्रीरामपूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. यावेळी जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर हेही उपस्थित होते.

**विखेंचा राजकीय डाव यशस्वी**

या प्रवेशामुळे विखे पाटील गटाने काँग्रेसच्या ससाणे गटावर मोठा राजकीय आघात केला आहे. श्रीरामपूर शहरातील काँग्रेसच्या प्रमुख स्थानिक नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने आगामी निवडणुकांमध्ये भाजपची ताकद अधिक बळकट होणार आहे.

भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये माजी नगराध्यक्ष संजय फंड, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास बिहाणी, माजी नगरसेवक अशिष धनवटे, शशांक रासकर, शामलिंग शिंदे, कैलास दुबय्या, मनोज लबडे, राजेंद्र आदिक, संजय गांगड, सोमनाथ गांगड यांचा समावेश आहे. हे सर्व माजी आमदार जयंत ससाणे यांचे कट्टर समर्थक मानले जात होते.




**राजकीय समीकरणे बदलण्याची सुरुवात**

गेल्या काही वर्षांपासून ससाणे गटात पक्षबदलाबाबत चर्चा सुरू होती, मात्र एकमत नसल्याने निर्णय लांबणीवर पडत होता. मात्र डॉ. सुजय विखे व राधाकृष्ण विखे पाटील यांनी श्रीरामपूरमधील विकासासाठी भाजपसोबत काम करण्याचा सल्ला वारंवार दिल्यामुळे अखेर निर्णय पक्का झाला. स्थानिक राजकारणात बदलती दिशा पाहता योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची वेळ आल्याचे मत काहींनी खासगीत व्यक्त केले.

# गांजाची वाहतूक करणारे दोघे जेरबंद

## तोफखाना पोलिसांची कारवाई | १.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नगर : प्रतिनिधी**

**तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजाची वाहतूक करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले असून, त्यांच्या ताब्यातून एकूण ८.५ किलो गांजा आणि १ लाख २७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई तोफखाना पोलिसांनी मोठ्या यशस्वितेसह केली आहे.**

संदीप राजू मालुंजकर

उर्वरीत पान ३ वर




# रणजित कासले बीड पोलिसांना शरण येणार

## माझाच बळी जाणार असल्याची व्यक्त केली भीती

**बीड : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी वाल्मीक कराड यांच्या फेक एन्काउंटरची ऑफर दिल्याचा दावा करत निलंबित पोलिस अधिकारी रणजित कासले यांनी एकच खळबळ उडवून दिली आहे.**

यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र पोलिसांना ''पकडून दाखवा'' असे खुले आव्हान दिले होते. मात्र आता त्यांनी स्वतःहून बीड पोलिसांच्या ताब्यात येण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट करत, आपला जीव धोक्यात असल्याची भीती व्यक्त केली आहे.



रणजित कासले यांनी सोशल मीडियावरून प्रसारित केलेल्या एका व्हिडिओद्वारे सांगितले की, ''कालपासून मी काही मित्र, वकील, तसेच पोलिस अधिकारी मित्रांशी संवाद साधला. तेव्हा लक्षात आलं की, सतत पळून काही उपयोग नाही. मी याआधीही अनेक संकटांचा सामना केला आहे. आता मी बीड पोलिसांच्या ताब्यात येण्याचा निर्णय घेतला आहे. सिस्टिमच्या विरोधात फार काळ लढता येत नाही, हे समजले आहे.''

ते पुढे म्हणाले, ''मी माझे दोन्ही मोबाईल फोन पुन्हा सुरू करणार आहे. मात्र मला कॉल करू नका, फक्त मेसेज करा. मी प्रत्येक मेसेज वाचतो आणि शक्य असल्यास उत्तरही देतो.''

आपण केलेले आरोप खरे असून ते सिद्ध करून दाखवणार असल्याचा पुनरुच्चार करत कासले

उर्वरीत पान ३ वर

# 'तो' आका मंत्रिमंडळात!

## सिंधुदुर्ग हत्याकांडावर खा. संजय राऊत यांचा गंभीर आरोप

**नाशिक : प्रतिनिधी**

**बीडमधील महिलांवरील अत्याचारानंतर आता सिंधुदुर्गमधील हत्याकांडावरूनही राज्य सरकार अडचणीत येण्याची चिन्हं आहेत. या हत्याकांडातील 'आका' हा थेट राज्याच्या मंत्रिमंडळात बसलेला असल्याचा गंभीर आरोप शिवसेना (ठाकरे गट) प्रवक्ते व खासदार संजय राऊत यांनी केला आहे.**

नाशिकमध्ये ठाकरे गटाच्या विभागीय निर्धार शिबिराच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत पत्रकारांशी संवाद साधत होते. त्यांनी सिंधुदुर्ग



जिल्ह्यातील वैभव नाईक यांचे चुलते श्रीधर नाईक यांच्या निर्घृण हत्येचा उल्लेख करत सांगितले की, ''ही हत्या संतोष देशमुख यांच्याप्रमाणेच भीषण आहे. मागील काही वर्षांत सिंधुदुर्गमध्ये २७ खून झाले आहेत, त्यातील नऊ खून हे ठाकरे गटाच्या शिवसैनिकांचे आहेत. यामागे असलेल्या 'आका'चा शोध घेणे अत्यावश्यक आहे. विशेष म्हणजे

उर्वरीत पान ३ वर



# प्रगतीमंत्र

## तंत्रज्ञान अन् नोकरी...



**तंत्रज्ञानाचा वापर जस जसा वाढत आहे, तसतशी ते तंत्रज्ञान उपलब्ध करून देणाऱ्या सर्व्हिस प्रोव्हायडर्स आणि एज्युकेटर्सना मागणी वाढत आहे. टेक्निकल क्षेत्रात असणाऱ्या या मागणीकडे आतापर्यंत अनेकांचं दुर्लक्ष झालं आहे. मात्र सर्व्हिस प्रोव्हायडर्स आणि एज्युकेटर्स हे आयटी विभागाचे दोन प्रमुख आधारस्तंभ आहेत, हे विसरून चालणार नाही. शैक्षणिक संस्था आता अधिकाधिक टेक्नोसॅव्ही (तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत) होत असल्यामुळे कन्टेंट डेव्हलपर्स, प्रोग्रॅमर्स, फॅकल्टी आणि मेन्टेंन्स इंजिनीअर्स यांच्यासाठी मोठ्या प्रमाणावर नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत...**

करिअरचे हे पर्याय नवीन असले, तरी सातत्याने त्यांना असणारी मागणी वाढतंच आहे. मात्र या पदांवर नोकरी करताना आपलं ज्ञान आणि प्रशिक्षण सतत अपडेट करण्याची काळजी उमेदवारांनी घ्यायला हवी. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे एकाच वेळी नवीन नोकऱ्यांचे अनेक पर्याय जसे तयार होतात, तसेच जुने पर्याय बाद होतात (नवीन नोकऱ्या निर्माण होतात, तर जुन्या प्रकारातील नोकऱ्या कमी होतात). आयटी हे स्पेशलाइज्ड क्षेत्र असल्यामुळे या क्षेत्रात काम करताना तुमच्याकडे शैक्षणिक आणि तांत्रिक कौशल्य असणं आवश्यक आहे. अनेक विद्यापीठांमध्ये आयटीमधील अंडरग्रॅज्युएट, पोस्टग्रॅज्युएट, तसंच डॉक्टरल डिग्री प्रोग्रॅम्सही उपलब्ध आहेत. या क्षेत्रात येणाऱ्या होतकरू तरुणांनी एक गोष्ट कायम लक्षात ठेवायला हवी. ती म्हणजे, आपलं प्रशिक्षण अपडेट करणं. इथे काम करण्यासाठी औपचारिक प्रशिक्षणाची, पदवीची जशी गरज आहे, तशीच विषयाशी संबंधित ज्ञानाची. विषयाचं परिपूर्ण ज्ञान तुम्ही मिळवायला हवं, त्याचबरोबर विविध संकल्पना तुम्हाला माहित असायला हव्यात. हे अत्यंत आवश्यक आहे. कारण वरवरचं ज्ञान तुम्हाला शॉर्ट टर्मसाठीच यश मिळवून देतं, तर तपशीलवार (परिपूर्ण) ज्ञान आणि कौशल्य तुम्हाला लाँग टर्ममधील यश मिळवून देईल.

### यशस्वी करिअरच्या संधी

- कम्प्युटर हार्डवेअर डिझाइन, डेव्हलपमेंट अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनीज, ऑपरेटिंग अ‍ॅन्ड सिस्टीम सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कंपनीज.
- ॲप्लिकेशन अँड सिस्टीम सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कंपनीज.
- टेलिकम्युनिकेशन आणि नेटवर्किंगमध्ये स्पेशलाइज्ड असणाऱ्या कंपन्या, तसंच टेलिकम्युनिकेशन हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर कंपन्या.
- यूझर कंपनीज, तसंच मध्यम आणि लघु कंपन्या.
- शाळा, बँका, डिपार्टमेंटल स्टोअर्स यासारखे मध्यम आणि लघु स्तरावरील यूझर्स.

### आयटी प्रोफेशनल्सची गरज

आजच्या घडीला कोणतंही क्षेत्र आयटी प्रोफेशनल्स शिवाय कार्यरत होऊच शकत नाही. लहान-मोठ्या प्रमाणावर का असेना; प्रत्येक क्षेत्रात या आयटी प्रोफेशनल्सची गरज असतेच. अर्थात, प्रत्येक क्षेत्रातील आयटी प्रोफेशनल्सची गरज आणि कामाचं स्वरुप वेगवेगळं आहे आणि दिवसागणिक त्यात बदल होत असतात. थोडक्यात सांगायचं, तर तांत्रिकदृष्ट्या कुशल असणाऱ्या आणि कामात येणाऱ्या समस्येला दूर करण्याचं कौशल्य अंगी असणाऱ्या व्यक्तीला इथे हमखास यशस्वी करिअर करता येणं शक्य आहे.



## क्लिनिकल सायकॉलॉजीस्ट

*सध्याचे जीवन खूपच अस्थिर आणि धकाधकीचे बनले आहे. कर्जबाजारी आणि नापिकी मुळे होणारी शेतकऱ्यांची आत्महत्या असो किंवा कमी मार्क पडण्याच्या धास्तीने एखाद्या विद्यार्थ्याने केलेली आत्महत्या असो, या बाबी मनोविकाराशी निगडित आहेत. मानस शास्त्रातील अध्ययनामुळे केवळ करिअरच नाही, तर मानवसेवा देखील आपल्या हातून घडू शकते. आगामी काही वर्षांत मोठ्या संख्येने क्लिनिकल सायकॉलॉजिस्टची गरज भासू शकते. चांगल्या जीवनासाठी उत्तम शारीरिक आरोग्याबरोबरच उत्तम मानसिक आरोग्य असणेही तितकेच महत्त्वाचे मानले जाते. माणसाच्या मानसिक आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली असून, त्यावर अनेक विद्यापीठांतून संशोधन केले जात आहे. जर आपल्याला मानवी मेंदूतील रहस्य सोडवायचे असेल आणि मनोरुग्ण व्यक्तीवर उपचार करायचे असतील, तर क्लिनिकल सायकॉलॉजी हा एक चांगला पर्याय मानला जातो. क्लिनिकल सायकॉलॉजी हा विषय मानसिक आरोग्याच्या समस्या समजून घेण्यासाठी आणि संपूर्ण मानसिक, भावनिक, तसेच आचार- विचारासंबंधी विकारांचा दबाव, चिंताग्रस्त, नैराश्य, मनोविकृती यावर प्रभावीपणे उपचार करून विकासाला प्रेरणा देण्याचे काम करते. माणसाचा चेहरा किंवा तो विचार कसा करतो हे ओळखण्याचे काम क्लिनिकल सायकॉलॉजी शिकवते, असा अर्थ काढणे चुकीचे ठरते. कारण हा विषय केवळ यासंबंधी मिथक मानले जाते. मनुष्याचा मेंदू जेवढा गूढ आहे, तेवढीच त्याची कार्यप्रणाली देखील. क्लिनिकल सायकॉलॉजीत माणसाच्या आचार-विचाराबाबत माहिती दिली जाते. या विषयात मानवाच्या मेंदूसंबंधी प्रकृती, प्रक्रिया, प्रतिक्रिया आणि अन्य बाजूंवर संशोधन केले जाते.*



# प्रोफेशनल वागण्याची पद्धत!

**उत्तम शैक्षणिक पार्श्वभूमी, चांगली नोकरी, मोठे पद, चांगला स्वभाव, संबंधित विषयात तज्ज्ञ हे सारं जुळून आलं म्हणजे प्रोफेशनल होता येतं असं नाही. प्रोफेशनल असणं म्हणजे विचार, वागण्याची पद्धत अशा अनेक गोष्टी. प्रोफेशनल असण्याला असे अनेक पैलू आहेत.**

आजच्या स्पर्धेच्या जगात प्रोफेशनल राहा असं सर्वच जण सांगत असतात. पण प्रोफेशनल व्हायचं म्हणजे नेमकं काय? मी प्रोफेशनल कंपनीत काम करतो म्हणजे आपोआपच मी प्रोफेशनल आहे किंवा मी एका प्रोफेशनमध्ये काम करतोय म्हणजे मी प्रोफेशनल आहे, असा अनेकांचा समज असतो. पण ते जितकं सोपं दिसतं तसं प्रत्यक्षात मात्र ते नाही. मग प्रोफ ेशनल होणं म्हणजे काय? उच्चशिक्षित, तज्ज्ञ हे शब्द प्रोफेशनल शब्दाच्या किंचित जवळ जाणारे आहेत. पण केवळ शैक्षणिक पार्श्वभूमी असणं, डिग्री, नोकरी, गुण, पद, तज्ज्ञ हे असलं म्हणजे प्रोफेशनल होता येतं असं नाही. प्रोफेशनल असणं म्हणजे विचार, वागण्याची पद्धत अशा अनेक गोष्टी. प्रोफ ेशनल असण्याला अनेक पैलू आहेत. इण्डस्ट्री कोणतीही असो, कामाचा प्रकार काहीही असो, पद कोणतंही असो, तुम्ही नोकरी करणारे असो किंवा बिझनेसमॅन प्रत्येकाने प्रोफ ेशनल होण्यासाठी काही अलिखित नियम पाळणं आवश्यक ठरतं.




### प्रोफेशनल होण्यासाठी...

- अनेक लोक असं म्हणतात की ऑफिसमध्ये चालणाऱ्या गप्पाटप्पांमध्ये आम्ही सहभागी होत नाही. पण फक्त ऐकत राहण्यामुळेही गॉसिप्सना चालना मिळते. म्हणूनच जेव्हा- जेव्हा आणि जिथे- जिथे गॉसिप्स टाळता येतील तिथे-तिथे ते टाळा.
- ऑफिसमधलं राजकारण हा तर कर्मचाऱ्यांचा अगदी जिव्हाळ्याचा विषय. जवळपास प्रत्येकालाच असं वाटत असतं की तो किंवा ती या राजकारणाचा बळी आहे. पण असं वाटून घेण्यापेक्षा फक्त आपल्या कामावर आणि त्यात अधिकाधिक सुधारणा कशी करता येईल यावर लक्ष दिलं पाहिजे. त्यामुळे अनावश्यक चर्चांना फाटा मिळतो.
- आजच्या काळात टीमवर्क हे सर्वात महत्त्वाचं आहे. त्यामुळे टीममध्ये काम करण्याची क्षमता आणि तयारी असली पाहिजे.
- आपल्या सहकाऱ्यांशी बोलताना आणि त्यांच्याशी वागताना त्यांच्या पर्सनल गोष्टींमध्ये दखल देऊ नका. कुणालाही मदतीचा हात पुढे करणं हे चांगलचं असतं. पण त्यासाठी काही मर्यादा असतात हे कायम ध्यानात असू द्या.
- ऑफिसमधला आपला कामाचा अवाका आणि स्वातंत्र्य ओळखा आणि त्यानुसारच वागा. एखाद्या कामाची जबाबदारी स्वीकारणं अनेकांसाठी कठीण जातं. यामागची कारणं ओळखा. टीमलीडर म्हणून काम करताना अनुभवी व्यक्तींना कधीही कमी लेखू नका.



- कंपनीचे नियम काटेकोरपणे पाळा. ड्रेसकोड, वेळ, वागणं, कामाची पद्धत याबाबतचे नियम पाळले गेलेच पाहिजेत यांची काळजी घ्या. कामाच्या डेडलाइन्स पाळणं सर्वात महत्त्वाचं असतं. ती न पाळण्याची कारणं देणं, अकार्यक्षमता खपवून घेतली जात नाही. तुमच्या कामाशी तुम्ही कायम प्रामाणिक राहिलं पाहिजे.
- जबाबदारी आणि लीडरशीप काळजीपूर्वक पार पाडा. त्याचा गैरवापर कधीही होता कामा नये. टीममधलं कुणी तुमच्या मतांशी सहमत नसलं तरी त्यांच्याविरोधात अधिकारांचा उपयोग होऊ नये.
- कामाबद्दल शंका विचारणं, प्रश्न विचारणं यामुळे तुमची कामाप्रती असलेली निष्ठा, तुमची विचार कळण्याची पद्धत, कामाला वाहून घेण्याची वृत्ती कळते.
- स्वत:ला विकसित करण्याची ओढ कायम असली पाहिजे. सहकाऱ्यांसोबत निकोप स्पर्धाही ठेवायला हरकत नाही. पण एकमेकांना सहकार्य करत राहून स्पर्धेचं वातावरण हवं.
- कामाचं उद्दिष्ट लक्षात घेऊन त्यानुसार काम करत रहायला हवं. तुमचं काम आणि घर यांची सरमिसळ कधीही करू नका. ऑफिसचं काम घरी नको आणि घरातल्या गोष्टी ऑफिसमध्ये नको हे कायम लक्षात असू द्या.
- कामावर फोकस करून आपल्याबाबतची विश्वासार्हता कायम ठेवली तसंच एकमेकांसोबतची नाती जपली की प्रोफेशनॅलिझम आपोआप अंगी बाणवला जातो आणि या प्रकारे काम करणाऱ्यांचं भविष्य उज्वल असतं हे कायम लक्षात ठेवा.

# फार्मसी ग्रॅज्युएट होताना...



**सायन्स शाखेतील एक क्षेत्र म्हणून फार्मसीकडे पाहिलं जातं. नवीन औषधांची निर्मिती, जी औषधे आहेत त्यांच्यात काळानुसार बदल, विकास करणे आणि औषधांचं वितरण आदी कामे या क्षेत्रातील पदवीधर म्हणजे फार्मसी ग्रॅज्युएट करतात. आपल्या आजारांवर डॉक्टर आपल्याला औषधं देतात. याच औषधांचे उत्पादन करणे, नवनवीन औषधे शोधणे, औषधांची गुणवत्ता तपासणे आणि सांभाळणे, औषधे बाजारात आणण्यापूर्वी प्रयोगशाळेत त्यांच्या तपासण्या करणे या औषधांचा मानवी शरीरावर दुष्परिणाम (साइड इफेक्ट्स) होऊ नये ही सर्व कामे पार्मासिस्ट करत असतो.**

### नोकरीच्या संधी

बी. फार्म आणि डी. फार्म केलेल्या विद्यार्थ्यांना सरकारी क्षेत्रात, केमिकल इंडस्ट्रीज, अन्न आणि औषध उत्पादन क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळतात. याशिवाय, स्वत:चं मेडिकल, फार्मसी स्टोअर सुरू करण्याचा पर्यायही आहे. फार्मसी स्टोअर सुरू करण्यासाठी स्टेट फार्मसी कौन्सिलकडून लायसन्स मिळवावं लागतं. बरेचसे फार्मसी पदवीधर झालेले विद्यार्थी बायोटेक लॅबोरेटरीजमध्ये काम करणं पसंत करतात, तर काही जण फार्मास्युटिकल प्रोडक्ट्सच्या सेल्स आणि मार्केटिंगचं काम करायला प्राधान्य देतात.

### शैक्षणिक पात्रता

फार्मसीचा कोर्स करण्यासाठी पीसीएम- बी विषय घेऊन बारावी सायन्स पास असणं आवश्यक आहे. या क्षेत्राचा पाया कॉलेजच्या सुरुवातीच्या वर्षातच घातला जातो. अकरावी- बारावी (सायन्स) ला असणाऱ्या बायोलॉजी आणि केमिस्ट्री या विषयांच्या अभ्यासाचा फायदा पुढे जाऊन फार्मसीचा अभ्यास करताना होतो.



फार्मसीमध्ये डिप्लोमा इन फार्मसी आणि बॅचलर इन फार्मसी हे दोन प्रकारचे (डिप्लोमा आणि डिग्री) कोर्स उपलब्ध आहेत. सरकारी तसेच, खाजगी संस्थांमध्ये हा कोर्स उपलब्ध असून तिथे प्रवेश मिळवण्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागते.

### कुठे शिकाल?

- **भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फार्मसी**

www.bharatividyapeeth.edu

- **बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी**

www.bcpindia.org

- **मुंबई एज्युकेशन ट्रस्टचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी**

www.met.edu

- **पार्श्वनाथ चॅरिटेबल ट्रस्टचे वीर माता हिराबेन शहा कॉलेज ऑफ फार्मसी**

www.parshwanathcollege.com

- **एसव्हीकेएमचे डॉ. भानुबेन नानावटी फार्मसी कॉलेज**

www.mithibai.svkm.ac.in



### काही उपलब्ध पदे

- फार्मासिस्ट : बी. फार्म केलेल्या विद्यार्थ्यांना हेल्थ सिस्टम फार्मासिस्ट, हॉस्पिटल फार्मासिस्ट, कम्युनिटी फार्मासिस्ट, इंडस्ट्रिअल फार्मासिस्ट, रिटेल फार्मासिस्ट आणि रिसर्च फार्मासिस्ट म्हणून काम करता येते.
- क्वॉलिटी अश्युरन्स : क्लिनिकल केअर योजना विकसित करणे, प्रतिकूल औषधोपचारांच्या घटनांचा तपास करणे तसेच असाध्य आजारांविषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचं काम क्वॉलिटी अश्युरन्स म्हणून काम करणारे फार्मसी पदवीधर विद्यार्थी करतात.
- क्वॉलिटी कंट्रोल : औषधे नियामक मंडळाच्या नियमांनुसार गुणवत्तापूर्ण औषधांची निर्मिती होत आहे, की नाही हे पाहण्याचं काम क्वॉलिटी कंट्रोलर म्हणून काम करणारे फार्मसी पदवीधर करतात.
- क्लिनिकल रिसर्च : बायो इक्विव्हॅलन्स, बायोअ‍ॅव्हॅलिबिलिटी, सेंट्रल लॅबोरेटरीज यासारख्या ठिकाणी क्लिनिकल ट्रायल्स, क्लिनिकल रिसर्च, इन्व्हेस्टिगेशन, टेक्निकल रायटर्स आदी पदांवर काम करण्यासाठी फार्मसी ग्रॅज्युएट्स करतात.

# कंपनीला समजताना...

**दुसऱ्यांना समजून घेतलं, तर दुसरे आपल्याला समजून घेतील ही उक्ती तंतोतंत खरी आहे. नात्यांमध्ये कोणत्याही अडचणी येऊ नये म्हणून या उक्तीचा अंमल जसा आपण करतो, तसंच प्रोफेशनल लाइफमध्येही ही बाब दुर्लक्षित करून चालणार नाही. कोणत्याही संस्थेत काम करताना फक्त आपल्या कामाचं स्वरुप जाणून घेणं पुरेसं नसतं, तर एकूणच त्या संस्थेच्या कामाची माहिती करून घ्यायला हवी.**



आता कुणालाही प्रश्न पडू शकतो, की आपण ज्या कंपनीत काम करतो, त्या कंपनीला का जाणून घ्यायचं? तर याचं उत्तर म्हणजे आपण ज्या कंपनीत काम करतो त्या कंपनीची काम करण्याची पद्धत, तिची मानसिकता, त्यांची तत्त्वं, प्लॅनिंग ॲण्ड स्टॅटेजीज आदी गोष्टी माहीत करून घेतल्या, की त्या प्रकारे स्वत:ला घडवता येतं, मोल्ड करता येतं. कंपनीच्या वातावरणाप्रमाणे स्वत:ला 'मोल्ड' करून घेतलं, की तिथे रुळायला सोपं होतं. कंपनीचे ऑब्जेक्टिव्हज, व्हिजन काय आहे हे जाणून घेतलं, की कंपनीच्या पुढील वाटचालीचा अंदाज आपल्याला येतो. यामुळे आपलं काम आपण कशा प्रकारे करायचं, हे स्वत:लाच समजून येतं. कंपनीच्या फायद्यासाठी आपलं कॉन्ट्रिब्युशन आपण कसं करायला हवं, हेसुद्धा यामुळे जाणून घेता येईल. तुमची कंपनी उत्पादन क्षेत्रात काम करते का, की तुम्ही सर्व्हिस इण्डस्ट्रीत आहात किंवा टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रात ते आधी जाणून घ्या. यामुळे या क्षेत्रातील आपल्या कंपनीची वाटचाल, आवाका (स्कोप), प्रगती हे कळू शकतं. अधिक रिस्क असणाऱ्या क्षेत्रात काम करणं खूपच कठीण असतं. म्हणूनच अशा क्षेत्रात कमी तास काम करूनही अधिक पगार मिळतो, तर काही क्षेत्रात भरपूर तास काम करूनही कमी पगार मिळतो. म्हणूनच तुम्ही कोणत्या कॅटेगरीत मोडता, ते आधी जाणून घ्या.

### वातावरण लक्षात घ्या

आपल्या कामाच्या ठिकाणचं वातावरण समजून घेणंही तेवढंच महत्त्वाचं असतं. आपले सहकारी, त्यांची कामाची पद्धत या गोष्टी एकदा समजून घेतल्या, की तिथे ॲडजस्ट होता येतं. स्वत:ची काम करण्याची पद्धत, काही समज, मूल्यं असणं योग्यच आहे पण, टीममध्ये काम करताना तिथे असणारे नियम पाळायला लागतातच. आपल्या कंपनीच्या पॉलिसीज, नियम जाणून घेतल्यामुळे असणारे फायदे समजून येतात शिवाय, कोणत्या मर्यादा पाळायच्या हेसुद्धा समजून येतं. कामाच्या ठिकाणी असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या रचनेला समजून घ्यायला हवं. आपण कोणत्या अधिकाऱ्याला रिपोर्ट करायचं आहे, ते नीट समजून घ्या. अन्यथा बॉस आणि तुमच्यामधलं नातं बिघडू शकतं. आपण ज्या संस्थेत काम करतो, तिथे घडणाऱ्या सगळ्या गोष्टींची माहिती ठेवा. कंपनी आपल्या स्टाफला देणाऱ्या संधींची माहिती करून घेतल्यास त्याचा फायदा स्वत:चा करिअर ग्राफ उंचावण्यासाठी करून घेता येईल.



### भविष्याचा विचार महत्त्वाचा...

तुम्ही काम करता ती कंपनी अनेक प्रकारची सेवा देणारी, उत्पादन घेणारी असू शकते. तिथे अनेक प्रकारचे जॉब असू शकतात. पण, आपण जो जॉब करतो तो आपण खरंच करू शकतो का, आपलं भविष्य आपण त्यातच पाहतोय का, असा सारासार विचार करायला विसरू नका. यामुळे स्वत:चं करिअर नीट प्लॅन करता येईल. शिवाय आपल्या स्टेन्थ एरियाज म्हणजे आपल्या गुणांचा नीट वापर करून अधिक कार्यक्षमतेने काम करणं शक्य होतं. प्रत्येक कंपनीची काम करण्याची पद्धत, कामाचे तास वेगवेगळे असतात. या सगळ्या गोष्टी समजून घेतल्या, तर तुमचं वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याचा समतोल नीट साधता येऊ शकतो. योग्य प्रकारे वेळेचं नियोजन करून अधिक कार्यक्षमतेने काम करणं आणि आपलं व्यावसायिक जीवन सुखद करता येतं. परिणामी, जॉबमध्ये जास्तीत जास्त यशस्वी होण्याची शक्यता वाढते.

### जॉब बदलताना...

जॉब होपिंग (जॉब बदलताना) च्या वेळी बरेच जण ज्या कंपनीत नोकरीसाठी अर्ज करतात, तिच्याबद्दल जाणूनच घेत नाहीत. या कंपनीत आपल्याला फार काळ राहायचं कुठे, असा विचार करत कंपनीबद्दल जाणून घेण्याचे श्रमच घेतले जात नाहीत. पण, इथे मुद्दा असतो तो तुम्ही किती काळ त्या कंपनीत राहणार यापेक्षा तुम्ही किती चांगल्या प्रकारे तिथे काम करून दाखवलं आहे हा. आणि नाहीतरी तुम्ही त्या कंपनीत काम करण्याचं ठरवलं आहेच, तर त्याबद्दल थोडंफार जाणून घेणं तुमच्याच फायद्याचं ठरू शकतं. लक्षात ठेवा, प्रत्येक कंपनी म्हणजे तिथे काम करणाऱ्या लोकांचं प्रतिबिंब असतं!



## शॉर्ट न्यूज

### मनसेचा थेट मुख्याधिकाऱ्यांवर हल्लाबोल

■ **कोपरगाव :** शहरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सार्वजनिक वाचनालयाच्या जागेवरून आक्रमक आंदोलन करत नगरपालिकेच्या प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तर जागा नगरपालिकेच्या मालकीच्या असून त्या ठिकाणी मराठा पंच कमिटीचे बेकायदेशीर रित्या जाळी मारून ताबा घेतल्याचा आरोप मनसेने केला आहे. या प्रकरणावर कारवाई करण्यात यावी अशी जोरदार मागणी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्य अधिकारी यांच्याकडे केली आहे. यावेळी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी थेट मुख्य अधिकारी यांच्या दालनात प्रवेश करत आपली नाराजी व्यक्त केली.

### दोन लाख ७४ हजारांचा मुद्देमाल जप्त

■ **नेवासा :** शहरात मावा गुटखा विक्री करणाऱ्या आणि बनविणाऱ्यांवर धाड टाकून त्यांच्याकडून सुंगधित तंबाखू, मावा तयार करण्याचे मशीन असा एकूण २ लाख ७४ हजार ५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करत आठ जणांना अटक करण्यात आली असून गुन्हा दाखल प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत चालू होती. या धाडसी कारवाईमुळे गुटखा तस्करांचे शहरात चांगलेच धाबे दणाणले असून पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे आणि पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### सरपंचाकडून महिला कर्मचाऱ्याच्या छळ

■ **पाथर्डी :** तालुक्यातील एका ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यासोबत सरपंचाने अश्लिल वर्तन करत शारिरीक छळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत पीडित महिलेने पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी सरपंच संजय मरकड विरोधात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे. त्या प्रकरणातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावात या दोन्ही घटनांमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाला आहे.

### मंडप तुटल्याने तीन एकर द्राक्षबाग जमीनदोस्त

■ **श्रीगोंदा :** द्राक्षबागेच्या मंडपाच्या तारा तुटल्याने तब्बल तीन एकरावरील द्राक्षबाग जमीनदोस्त झाल्याची घटना तालुक्यातील पारगाव सुद्रिक येथे घडली. या बागेत सुमारे ८० ते ९० टन द्राक्ष लागलेले असल्याने सुनील बबन जगताप या शेतकऱ्याचे जवळपास पन्नास लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. जगताप यांची माणिक चमन या संकरित वाणाची सुमारे तीन एकर द्राक्ष बाग आहे. द्राक्ष काढणीस जवळपास पंधरा दिवसांचा अवधी होता. या बागेचा पंचनामा करून शेतकऱ्याला नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### घंटागाडी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

■ **संगमनेर :** विविध मागण्यासाठी येथील घंटागाडी कर्मचाऱ्यांनी काल सोमवारी काम बंद आंदोलन केले. यावेळी कर्मचाऱ्यांच्य मागण्याबाबत चार दिवसात सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन मुख्याधिकारी रामदास कोकर यांनी दिल्यानंतर या कर्मचाऱ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. आरोग्य कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीचा लाभ मिळावा, कामाची वेळ ठरवून घ्यावी, ठेकेदार वेळेवर पगार देत नाही. या ठेकेदाराला समज देऊन कामगारांना पगार वेळेवर मिळावा, आदी मागण्यासाठी कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन केले. त्यानंतर हे कर्मचारी संगमनेर नगरपालिकेत गेले.

# दुचाकी चोरी करणारे चार आरोपी गजाआड

## चोरीच्या पाच दुचाकी हस्तगत । एलसीबीच्या पथकाची कारवाई



**कर्जत : प्रतिनिधी**

**अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात दुचाकी चोरी करणाऱ्या टोळीतील चार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी (ता. १५) जेरबंद केले. त्यांच्याकडून चोरीच्या पाच दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.**

सचिन देविदास दाने (वय २५, रा. नांदुर्खी रस्ता, शिर्डी, ता. राहाता), प्रसाद राजेंद्र रोटे (वय १९, रा. जानेफळ, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर), गणेश भागीनाथ जगदाळे (वय २८, रा. जानेफळ, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर व एक अल्पवयीन मुलगा यांचा जेरबंद आरोपींत समावेश आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यातील दुचाकी चोरांवर कारवाईचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली होती की, कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे सचिन दाने हा चोरीच्या दुचाकी विक्रीसाठी घेऊन येणार आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचला असता त्यांना पाच दुचाकी विक्रीसाठी आणल्याचे आढळून आले. त्यानुसार पथकाने छापा टाकत चार आरोपींना ताब्यात घेतले तर त्यांचा साथीदार सुरज गायकवाड हा पसार झाला आहे.

पथकाने जेरबंद

आरोपींकडून सहा लाख ४० हजार रुपये किमतीच्या पाच दुचाकी हस्तगत केल्या आहेत. आरोपींनी मिरजगाव, राहाता, पुणे, येवला व शिर्डीतून या दुचाकी चोरल्याचे तपासात समोर आले आहे. पथकाने पुढील तपासासाठी आरोपींना मिरजगाव पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# जल व्यवस्थापनाच्या जनजागृती उपक्रमात सर्व यंत्रणांनी सक्रिय सहभाग घ्यावा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

**जलसाक्षरता वाढवणे, पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देणे आणि जलव्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबविण्यासाठी जलसंपदा विभागाच्यावतीने 'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा' शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झाले. जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यातील कार्यक्रमांमध्ये प्रत्येक पालकमंत्री महोदयांनी सक्रिय सहभागी घेऊन कामे करून घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले.**

जलसंपदा विभागाच्या वतीने १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत जलव्यवस्थापन कृती पंधरवडा साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याचे उद्घाटन मंत्रालयातील मंत्रीमंडळ सभागृहात झाला. त्यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य मंत्री, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर



मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या पोस्टरचे अनावरण झाले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या माध्यमातून समाजात पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत जनजागृती वाढविण्यात यावी. राज्यातील सिंचन व बिगर सिंचनासाठी आवश्यक पाण्याचा प्रश्न सोडविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. परंतु लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे हा उपक्रम लोकाभिमुख करण्यासाठी सर्व यंत्रणा व घटकांनी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

वाचकांच्या लेखणीतून

# शब्दालंकार

अलंकार म्हणजे काव्याची शोभा वाढविणारे गुणधर्म होत. अलंकारशास्त्रात अलंकारांचे दोन उप-प्रकार आहेत. शब्दालंकार आणि अर्थालंकार. शब्दालंकारांची संख्या अगदीच कमी आहे. त्या मानाने अर्थालंकारांची संख्या बरीच जास्त आहे. शब्दालंकार हे अलंकार शास्त्रांचे बहिरंग तर अर्थालंकार हे अंतरंग म्हणता येईल . काव्यशास्त्रातील एकूण अलंकारांची संख्या शेसव्वाशे भरते.

शब्दालंकारांचे मुख्यतः तीन प्रकार आहेत. (१) अनुप्रास अलंकार (१) यमक अलंकार आणि (3) श्लेष अलंकार.

(१) अनुप्रास अलंकार :- काव्यात एकाच वर्णाची पुनरावृत्ती होते तेव्हा अनुप्रास अलंकार होतो.

उदा. बालकाचे बोबडे बोल ऐकून मातेचा आनंद ओसंडत होता. (स्वरचित)

या उदाहरणात ब आणि अ या वर्णांची पुनरावृत्ती आहे. ती ऐकण्यास गोड वाटते. चित्ताकर्षक वाटते.

(२) यमक अलंकार :- काव्यपंक्तीच्या प्रथम चरणातील अंतीम वर्ण दुसऱ्या चरणातील अंतीम वर्णाशी खटकेबाज जोड दिसली म्हणजे हा अलंकार होतो.

उदा. एक होता ससा
त्याचा बसला घसा (स्वरचित)

येथे ससा = घसा असे यमक जुळले आहे. त्यामुळे काव्यात ठसकेबाजपणा आणि नादही निर्माण झाला आहे.

(3) श्लेष अलंकार :- दुसऱ्या काव्य चरणातील




अंतीम शब्दांचे वर्ण पहिल्या काव्य चरणासारखेच असले तरी अर्थभेद जाणवतो. त्यामुळे त्यात काव्य चमत्कृती आढळते.

उदा. शिशुपाल नवरा मी न वरी ।
श्रीकृष्ण नवरा मी नवरी ।। (मोरोपंत)

या उदाहरणात श्रीकृष्णाची भगिनी रुक्मिणी म्हणते, मी शिशुपालाला वरणार नाही. कारण श्रीकृष्ण नवरा आणि मी नवरी आहे. त्यालाच मी मनोमन वरले आहे. या पद्यात पहिल्या काव्य चरणात न वरी हे वर्ण किंवा शब्द आला आहे. दुसऱ्याही चरणात नवरी वर्ण किंवा शब्द आला आहे. पण त्यांच्यात अर्थभेद (श्लेष) आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# हेमलता पाटलांचा शिंदे गटाला रामराम !


## दीड महिन्यापूर्वीच केला होता प्रवेश
## नाशिकच्या राजकारणात खळबळ

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिकच्या हेमलता पाटील यांनी शिवसेना शिंदे गटाला रामराम ठोकला आहे. हेमलता पाटील यांनी दीड महिन्यांपूर्वीच काँग्रेस प्रदेश प्रवक्ते पदाचा राजीनामा देत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. आता शिवसेना शिंदे गट सोडल्यानंतर सध्या कोणत्याही पक्षात जाणार नसल्याचा खुलासा केला आहे.**

हेमलता पाटील यांनी एका व्हिडिओमधून त्यांची भूमिका मांडली आहे. हेमलता पाटील म्हणाल्या, मी गेल्या ३५ वर्षांपासून काँग्रेस पक्षामध्ये काम करत होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मी इच्छुक असताना मला उमेदवारी मिळाली नाही. म्हणून मी काँग्रेस पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला होता. त्यानंतर मी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता.

पुढे त्या म्हणाल्या, शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर गेल्या दीड महिन्यात मी या पक्षाला आणि पक्षामध्ये काम करताना योग्य तो न्याय देऊ शकत नाही. मी योग्य ते काम करू शकत नाही, अशी माझी स्वतःची प्रामाणिक भावना झाली. त्या भावनेला साक्षी ठेवून मी यानंतर या पक्षात काम करायचे नाही, असे ठरवले आहे. कारण एखाद्या पक्षात आपण काम करताना प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. त्या पक्षाला



योग्य तो न्याय दिला पाहिजे. परंतु, तसा न्याय मी देऊ शकत नाही. त्यामुळे सध्या मी कुठल्याही पक्षात काम न करण्याचे ठरवले आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास हेमलता पाटील इच्छुक होत्या. मात्र महाविकास आघाडीत शिवसेना ठाकरे गटाला ही जागा गेली. शिवसेना ठाकरे गटाने माजी आमदार वसंत गीते यांना संधी दिली होती. त्यानंतर हेमलता पाटील नाराज झाल्या होत्या. अनेक वर्ष काँग्रेस पक्षात एकनिष्ठ राहून देखील आपल्यावर अन्याय झाल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली होती व एकमेकांच्या कापाकापीतच पक्षाचे नेते मशगूल असल्याचा आरोपही हेमलता पाटील यांनी केला होता.

# काळभैरवनाथांचा रविवारी आगडगावला यात्रोत्सव

## मान्यवरांच्या हस्ते महाआरती
## दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा हगामा

**आगडगाव : प्रतिनिधी**



**येथील काळभैरवनाथांची यात्रा रविवारी (ता. २०) भरणार आहे. उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती देवस्थान ट्रस्ट व आगडगाव टोकेवाडी ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली.**

सालाबादप्रमाणे रविवारी सकाळी गंगेहून आणलेल्या कावडीची मिरवणूक, देवाला गंगाजलाभिषेक होईल. यावेळी होणाऱ्या अन्नदानासाठी एका भाविकाकडून गुप्तदान करण्यात आले आहे. आमदार शिवाजी कर्डिले, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, आशिष पोखरणा, गणेश आव्हाड, गौरव भंडारी, सचिन दुसुंगे आदींच्या हस्ते महाआरती होईल. दुपारी १२ वाजता महाआरतीनंतर होणारे अन्नदान महेश देशमुख व परिवाराने केले आहे. सायंकाळी सात वाजता कल्याण काळे महाराज यांचे कीर्तन होईल. त्यानंतर यात्रोत्सवाची काठ्यांची मिरवणूक होईल. दरम्यानच्या काळात हमीद सय्यद सोंगी भारूड सादर करतील.

यात्रोत्सवानिमित्त नगरच्या एसटी बसस्थानकातून जादा बसची व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेत येणाऱ्या भाविकांसाठी पाणी, सावलीची व्यवस्था, तसेच दर्शन रांगेची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व सुविधा ट्रस्टच्या वतीने पुरविल्या जातील. दुसऱ्या दिवशी (ता. २१) कुस्त्यांचा जंगी हगामा होणार आहे. यामध्ये महेश फुलमाळी, भरत होळकर, मनोहर कर्डिले, महेश वाघमोडे यांबरोबरच अनेक मल्ल सहभागी होणार आहेत. कुस्त्यांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. भाविकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

(पान १ वरून)

### लाडकी बहीण योजना बंद केली जाणार!

दिला गेला. आधीच कारवाई का झाली नाही? पुण्यातील एसटी बलात्कार प्रकरणावर गृह राज्यमंत्री दिलेलं विधान अत्यंत असंवेदनशील आहे. जर मुख्यमंत्री स्वतःच्या कार्यकर्त्यालाही न्याय देऊ शकत नसतील, तर सर्वसामान्य जनतेला काय न्याय मिळेल?'' असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

या सरकारला ना लाज आहे ना संवेदना त्यांच्या जाहीरनाम्यातील एकही मुद्दा आज बजेटमध्ये दिसत नाही. जनतेची फसवणूक आणि महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली केवळ ढोंग चाललं आहे,'' अशा शब्दांत आदित्य ठाकरेंनी भाषणाचा शेवट केला.

### पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक

पाण्याचे बजेट तयार करणे आवश्यक असून, पाण्याची टंचाई असताना त्याचे शुद्धीकरण, साठवण आणि प्रभावी वितरण यावर भर द्यावा. पंधरवड्यापुरता उपक्रम न राहता वर्षभर नियोजनपूर्वक आणि उद्दिष्टपूर्ण काम व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

### गांजाची वाहतूक करणारे दोघे जेरबंद

(वय २५, रा. संजय गांधी नगर, संगमनेर) आणि सचिन प्रताप कतारी (वय २६, रा. संगमनेर) अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांना सोनानगर परिसरात दोन व्यक्ती गांजाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिसांनी एक पथक तयार करून तात्काळ कारवाईसाठी सापळा रचला.

सापळा रचला आणि त्यानुसार आरोपी सोनानगर परिसरात पोहोचल्यावर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ८.५ किलो गांजा हस्तगत करण्यात आला, ज्याची एकूण किंमत १ लाख २७ हजार ५०० रुपये आहे.याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी गांजाचा मुद्देमाल जप्त करत संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींच्या अधिक तपासासाठी पोलिसांनी कार्यवाही सुरू केली आहे, आणि या कारवाईत त्यांना आणखी कोणाचे संलग्न असू शकतात हे तपासले जाईल.गांजा विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येत असून, पोलिस प्रशासन गांजा तस्करीच्या प्रकरणात कठोर दृष्टिकोन ठेवत आहे.

### रणजित कासले बीड पोलिसांना शरण येणार

म्हणाले, ''मी ज्यांच्यावर आरोप केले आहेत तेच आता भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. आता हे सर्व वॉशिंग मशीनमधून क्लीन होऊन बाहेर पडत आहेत. या सगळ्यात बळी जर कोणाचा जाणार असेल, तर माझाच. माझ्यावरच गुन्हे दाखल होत आहेत आणि अजून दोन-चार होतीलही. त्यामुळे मी स्वखुशीने बीड पोलिसांच्या ताब्यात जात आहे. त्यांनी मला अटक केली तरी चालेल, कारण ते माझेच डिपार्टमेंट आहे. मी त्यांचं मीठ खाल्लं आहे. मी माझी लढाई सुरू ठेवणार आहे.''

दरम्यान, याआधीच्या व्हिडिओमध्ये कासले यांनी सांगितले होते की, ''वाल्मीक कराड यांच्या एन्काउंटरबाबत मी अनेक चॅनेल्सवर मुलाखती दिल्या. यानंतर १४ एप्रिल रोजी माझ्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला. गजानन कांडकर यांनी बीडच्या एका पोलिस ठाण्यात यासंदर्भात फिर्याद दिली. बोलण्याच्या ओघात काही चुकीचे बोललो असल्यास मी त्यांची माफी मागतो, पण हेतूपूर्वक काही बोललो नव्हतो.''रणजित कासले यांच्या या वक्तव्यांनी आणि आगामी शरणागतीने संपूर्ण प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, या प्रकरणातील पुढील घडामोडीकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### 'तो' आका मंत्रिमंडळात!

हा 'आका' सध्या मंत्रिमंडळातच बसलेला आहे,'' असा खळबळजनक दावा राऊत यांनी केला.

''एक 'आका' मंत्रिमंडळातून बाहेर गेला आहे. आता दुसऱ्या आकाला देखील सरकारने पाठीशी घालू नये आणि तातडीने कारवाई करावी,'' अशी मागणीही त्यांनी केली.तसेच, निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजित कासले यांच्या आरोपांकडेही राऊत यांनी लक्ष वेधले. ''कासले यांनी केलेले आरोप हे गंभीर असून, त्यांच्या आरोपांमुळे सरकारकडून 'फेक एन्काउंटर' होण्याच्या प्रकारांचा पर्दाफाश झाला आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी झालीच पाहिजे,'' असे राऊत म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेले उत्तर असल्याचाही दावा केला. ''ते उत्तर मी सार्वजनिक केल्यास अनेकांच्या पायाखालची वाळू सरकेल,'' असा इशाराच त्यांनी दिला.दरम्यान, राऊत यांनी लाडकी बहीण योजनेबाबतही टीका केली. ''राज्य सरकारची आर्थिक स्थिती डबघाईला गेली आहे, हे आता अर्थमंत्री अजित पवार यांनाही मान्य करावं लागतंय. सरकारकडे कर्मचाऱ्यांचे वेतन द्यायला आणि लाडक्या बहिणींना पैसे देण्यासाठी निधी नाही. नमो शेतकरी योजनेचा लाभ घेतलेल्या आठ लाख महिलांना यंदा फक्त ५०० रुपये मिळणार आहेत. आधी दिले जात होते १५०० रुपये,'' असे सांगत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

''लाडकी बहिण योजना ही महिलांच्या मतांसाठी सुरू करण्यात आली होती. पंधराशे रुपयांत मते विकत घेतली गेली. आता त्याची किंमत ५०० रुपये झाली आहे. लाडक्यांनी याचा आता जाब विचारला पाहिजे,'' असा उपरोधिक टोला राऊत यांनी लगावला.

# गोरेगांवात शुक्रवारी नामवंत मल्ल ठोकणार शड्डू!

## बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशनचा उपक्रम | तब्बल पंधरा लाखांच्या बक्षिसांची खैरात | अंबिका माता यात्रोत्सवाचे निमित्त

**गोरेगांव : प्रतिनिधी**



**गोरेगांव येथील अंबिका मातेच्या वार्षिक यात्रोत्सवाचे औचित्य साधून मा. सभापती बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशनच्या वतीने शुक्रवार (दि.१८) रोजी भव्य कुस्त्यांच्या जंगी मैदानाचे आयोजन करण्यात आले असून राज्यातील नामवंत मल्ल या मैदानामध्ये शड्डू ठोकणार आहेत.**

धार्मिक असो किंवा राजकीय कार्यक्रम असो नेटके नियोजन करून उपस्थितांची वाहवा मिळविणाऱ्या गोरेगांवकरांनी यंदाही यात्रोत्सवाचे देखणे नियोजन केले आहे. या यात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कुस्त्यांच्या मैदानासाठी राज्यातील नामवंत मल्लांना निमंत्रीत करण्यात आले आहे. या मैदानात नेत्रदिपक कामगिरी करणाऱ्या मल्लांवर तब्बल १५ लाख रूपयांच्या बक्षिसांची खैरात करण्यात येणार आहे. प्रमुख १२ लढतींव्यतिरिक्त इतर ३३ लढतीही होणार असून या कुस्त्यांचा थरार पाहण्यासाठी कुस्ती शौकीनांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.



कुस्ती आखाड्याच्या तयारीची पहाणी करताना बाबासाहेब तांबे व पदाधिकारी

### रंगणाऱ्या लढती आणि इनाम

२लाख २१ हजार : माऊली जमदाडे व सोनू कुमार, १ लाख ७५ हजार : चेतन रेपाळे व अनिकेत मांडगे, १ लाख ५० हजार :अक्षय कावरे व प्रणित भोसले, १ लाख २५ हजार : किरण पाटोळे व सागर देवकाते, १ लाख १० हजार : अक्षय पवार व विजय पवार, १ लाख : मनोज फुले व अनिल लोणारे, ९० हजार : तुषार अरूण व राम वने, ८० हजार : भरत होळकर व शाम गव्हाणे, ७१ हजार : विशाल मांगे व अनिल कोकणे, ७० हजार : कुमार देशमाने व अरबाज शेख, ६० हजार : रोहित अजबे व ऋतिक माने, ५५ हजार : नीलेश उचाळे व तेजस उळागडडी.

### माया खुटेगांवकरचा ऑर्केस्ट्रा

यात्रोत्सवानिमित्त गुरूवार दि. १७ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता लावणीसम्राज्ञी माया खुटेगावकर यांच्या रूपानं देखणी या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे. माया खुटेगांवकर यांच्यासह नमिता पाटील व अर्चना जावळेकर यांचाही या ऑर्केस्ट्रामध्ये समावेश असून राज्यात लोकप्रियतेच्या शिखरावरील या ऑर्केस्ट्राची गोरेगांव पंचक्रोशीला उत्सुकता आहे.

# डॉ.आंबेडकर आधुनिक भारताचे शिल्पकार

## प्राचार्य डॉ. कुंदा कवडे यांचे प्रतिपादन

**अळकुटी : प्रतिनिधी**

**देशाच्या विविध क्षेत्रांमध्ये दिलेल्या योगदानामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आधुनिक भारताचे शिल्पकार तसेच आधुनिक भारताचे निर्माते म्हणून ओळखले जात असल्याचे प्रतिपादन प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले.**

अळकुटीच्या प्रवरा ग्रामिण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, त्याप्रंगी डॉ. कवडे यांनी उपस्थितांना संबोधित केले.

डॉ. कवडे म्हणाल्या, डॉ. आंबेडकर यांचा जन्मदिवस एक प्रमुख भारतीय उत्सव म्हणून दरवर्षी १४ एप्रिल रोजी जगभरात साजरा करण्यात येतो. हा सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक स्वरूपाचा उत्सव आहे. आंबेडकरवादी लोक या दिनाला समता दिन म्हणून तर राज्य शासन ज्ञान दिन म्हणून साजरा करते. संयुक्त राष्ट्रानेही पहिल्यांदा बाबासाहेबांची १२५ वी जयंती साजरी केली, त्यात १५६ देशांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. याप्रसंगी संयुक्त राष्ट्राने आंबेडकरांना विश्वाचा प्रणेता म्हणून संबोधल्याचे डॉ. कवडे यांनी सांगितले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अमोल नालकर, डेअरी डिप्लोमाचे प्राचार्य प्रा. प्रशांत लोखंडे, प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे, प्रा. सुनीता जाधव, प्रा. तांबे, डॉ. शांता थोरात, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. पांडूरंग उघडे, प्रा. संदीप गेटम, प्रा. प्रियंका दिवटे, सुनीता भालेराव, छाया म्हस्के, राहुल बोरूडे, मनोहर कनिंग्ध्वज, शिवाजी कळंबे आदी उपास्थित होते. प्रा. विशाल रोकडे यांनी प्रास्ताविक तर प्रा. स्वाती फापाळे यांनी आभार मानले.




अळकुटी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

### अस्पृश्यतेविरोधात चळवळ

डॉ. आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित, बौध्द चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरूध्द होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. महिला आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटीशांच्या मंत्रीमंडळात मजुरमंत्री तर स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौध्द धर्माचे पुनरूज्जीवक होते.

# विनोद गायकवाड डिजिटल मीडियाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष

## सांगली येथील अधिवेशनात घोषणा




### अन्यायाविरोधात प्रहार

डिजिटल मीडियाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड हा माझ्यासाठी सन्मानाचा क्षण आहे. या पदाला न्याय देताना जिल्ह्यातील माझ्या पत्रकार बांधवांना सोबत घेऊन डिजिटल मीडियाच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे, अन्यायाविरोधात प्रहार करण्याचे काम करणार आहे.

**विनोद गायकवाड**
जिल्हाध्यक्ष, डिजिटल मिडिया

**पारनेर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पुरस्कृत डिजिटल मीडियाच्या अहमदनगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी टाकळी ढोकेश्वर येथील विनोद किसन गायकवाड यांची सांगली येथे पार पडलेल्या अधिवेशनात निवड करण्यात आली.**

सांगली येथे पार पडलेल्या अधिवेशनामध्ये राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आ. गोपीचंद पडळकर, पत्रकार संघाचे प्रदेश संघटक संजय भोगरे, जर्नालिस्ट असोसिएशनचे अखिल भारतीय अध्यक्ष अशोक वानखेडे, प्रदेश सचिव डॉ. विश्वासराव आरोटे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे, राज्य पत्रकार संघाचे नवनाथ जाधव, संजय फुलसौंदर, दत्ता गाडगे, बाबाजी वाघमारे, श्रीनिवास शिंदे, महेश शिंगोटे यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकार विनोद गायकवाड हे टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी असून पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी आपल्या वेगळया शैलीमुळे ठसा उमटविला आहे. त्यांच्या निवडीमुळे ग्रामीण भागातील पत्रकारितेला प्रोत्साहन मिळेल अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या. गायकवाड यांच्या निवडीनंतर विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी डिजिटल मीडियाच्या वाढत्या प्रभावावर प्रकाश टाकतानाच पत्रकारांनी समाजहितासाठी जबाबदारीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. या अधिवेशनात राज्यभरातील पत्रकारांनी एकत्र येऊन भविष्यातील आव्हानांवर चर्चा करत पत्रकारितेच्या नव्या दिशा ठरविण्याचा संकल्प करण्यात आला.

# आशाताई वरखडे यांचे कार्य सेवाभावी मळगंगा ट्रस्टच्या नावलौकिकात भर

## शांताराम कळसकर यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या विश्वस्त आशाताई सोमनाथ वरखडे यांनी गेल्या एक वर्षात ट्रस्टमध्ये सेवाभावाने केलेल्या कार्यामुळे ट्रस्टच्या नावलौकिकात मोठी भर पडली आहे, असे गौरवोद्गार ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर यांनी काढले.**

आशाताई वरखडे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने कोणताही अवास्तव खर्च टाळून ट्रस्ट संचालित प्रसादालयाला आर्थिक देणगी दिली. त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत ग्रामस्थ आणि ट्रस्टच्या वतीने त्यांचा सन्मान सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब लामखडे व माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद होते. कार्यक्रमाला विविध संस्थांचे पदाधिकारी, ट्रस्टचे इतर विश्वस्त, सल्लागार मंडळाचे सदस्य, पत्रकार संघाचे प्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपाध्यक्ष वसंत कवाद यांनी या वेळी बोलताना सांगितले की, कपिलेश्वर उद्योग समूहाचे सर्वे सर्वा सोमनाथ वरखडे व आशाताई वरखडे हे सामाजिक व धार्मिक क्षेत्रात सातत्याने योगदान देणारे कार्यकर्ते आहेत. धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी कार्य करणारे एक प्रेरणादायी दांपत्य म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश ढवळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व ट्रस्ट विश्वस्त अनिल शेटे यांनी केले.

# परप्रांतीय कामगारांची पडताळणी करावी

## अभिजित रोहोकले यांची मागणी | अधिकृत कागदपत्रांची तपासणी होणे गरजेचे

**भाळवणी : प्रतिनिधी**



**भाळवणी व शेजारील गावे तसेच वाडयावस्त्यांवर मागील काही वर्षांपासून मोठ्या संख्येने परप्रांतीय कामगार राहत असून, यापैकी अनेकांच्या ओळखपत्रांची पडताळणी न झाल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामपंचायत व संबंधित घरमालकांकडून या कामगारांची आधार कार्ड, मतदार ओळखपत्र आदी कागदपत्रांची योग्य पडताळणी करण्यात आलेली नाही, अशी तक्रार स्थानिक प्रखर हिंदुत्ववादी कार्यकर्ते अभिजित रोहोकले यांनी केली आहे.**

गावातील व परिसरातील काही नागरिकांनी सांगितले की, अनेक परप्रांतीय कंपनी कामगार व खाजगी व्यवसायिक, मजूर म्हणून वास्तव्यास आहेत.काही परप्रांतीय कामगारांनी संशयास्पद कागदपत्रांच्या आधारे मतदार यादीत आपली नोंद करून घेतल्याचा संशय आहे. तसेच, पोलीस व्हेरिफिकेशन न झाल्यामुळे या व्यक्तींच्या पार्श्वभूमीबाबत माहिती उपलब्ध नाही.स्थानिक हिंदुत्ववादी कार्यकर्ते अभिजित रोहोकले यांनी यासंदर्भात पारनेर पोलीस प्रशासन व ग्रामपंचायतीकडे कारवाईची मागणी केली असून, वेळेवर पावले उचलली नाहीत तर ग्रामस्थांमध्ये रोष वाढण्याची शक्यता आहे, असे त्यांनी सांगितले.

नुकत्याच झालेल्या एका सणाच्या दिवशी गावात मोठ्या संख्येने बाहेरून आलेले नागरिक एकत्र जमल्याचे चित्र दिसून आले. यावरून काही नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने चिंता व्यक्त केली आहे. काही कामगारांकडून समाजविघातक वर्तन केल्याचीही तक्रार ग्रामस्थांनी केली असून, यासंदर्भात पोलीस यंत्रणेला सतर्क राहण्याची गरज आहे.ग्रामस्थांच्या मते, घरमालक व ग्रामपंचायतीने अशा प्रकारांना थांबवण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. सर्व परप्रांतीय कामगारांची नोंद, पोलीस पडताळणी आणि निवास परवाना याबाबत योग्य प्रक्रिया राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# वासुंदेत बिरोबा यात्रा उत्सव उत्साहात संपन्न

## धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन | हजारो भक्तांचा सहभाग

**वासुंदे : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील वासुंदे गावात ग्रामदैवत श्री. बिरोबा महाराज नूतन मंदिराच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला श्री. बिरोबा महाराज सार्वजनिक यात्रा उत्सव अत्यंत भक्तिभावपूर्ण आणि उत्साहात पार पडला. सोमवारी (दि. १४) ते मंगळवार (दि. १५) या कालावधीत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

सोमवारी सकाळी श्री. बिरोबा महाराजांचा महाअभिषेक व आरतीने उत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर पारंपरिक काठी घेऊन भव्य मिरवणूक वासुंदे गावातून काढण्यात आली, यामध्ये हजारो भाविक सहभागी झाले. मंगळवारी सकाळी रामायणाचार्य ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे (राहुरी) यांच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता झाली. त्यांनी बिरोबा महाराजांच्या जीवनचरित्राचे भक्तीपूर्ण विवेचन करत उपस्थितांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. हे कीर्तन स्व. लक्ष्मण झावरे यांच्या स्मरणार्थ संजय झावरे व राजेंद्र झावरे यांच्या सौजन्याने पार पडले.

दुपारी १ ते ४ या वेळेत शाहीर अण्णाभाऊ चौरे, शाहीर शांताराम किनकर, व संगीतरत्न भाऊसाहेब आंधळे यांच्या ‘सप्तसूर माझे’ या भावगीत व गायन कार्यक्रमाने रसिकांची मने जिंकली. या कार्यक्रमाच्या वेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील, त्यांच्या पत्नी सविताताई झावरे पाटील, वासुंदेचे सरपंच विमल झावरे, उपसरपंच शंकर बर्वे, वासुंदे सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

उत्सवाचे सूत्रसंचालन अशोक चेमटे यांनी केले, तर गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा.ठ. झावरे यांनी सर्व उपस्थित व सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वासुंदे गावातील युवकांनी व गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.



### विकासकामांचा संकल्प

ग्रामदैवत श्री. बिरोबा महाराजांच्या मंदिर परिसरात विविध विकासकामे राबवण्यात येत आहेत. बिरोबा उत्सवात दरवर्षी भव्य बैलगाडा शर्यत आयोजित केली जाते, यासाठी आवश्यक असलेले घाटाचे काम विकास निधीतून पूर्ण झाले आहे. लवकरच मंदिरासमोर भव्य व सुसज्ज सभामंडप उभारण्यात येणार असून, या मंडपाचा उपयोग धार्मिक, सांस्कृतिक व कौटुंबिक कार्यक्रमांसाठी होणार आहे.

**सुजित झावरे पाटील**
मा.उपाध्यक्ष,जिल्हा परिषद

# दादाभाऊ रसाळ यांचे निधन

**निघोज : प्रतिनिधी**



येथील प्रगतीशील शेतकरी दादाभाऊ सोनबा रसाळ यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले.मुंबई येथील बँक ऑफ अमेरीकाचे शाखाधिकारी संदिप रसाळ व निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे व्यवस्थापक रविंद्र रसाळ यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन मुली,भाऊ,भावजय, पुतणे,सुना,नातवंडे असा परिवार आहे. निघोज ग्रामीण संस्था परिवार, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था, निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्था तसेच शिववाडी, मोरवाडी, रसाळवाडी व निघोज ग्रामस्थांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# पिंपरीचा साई पुजारी जिल्ह्यात नंबर वन!

## २४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**पिंपरी जलसेन : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या पिंपरी जलसेन येथील शाळेचा विद्यार्थी साई ऋषिकेश पुजारी याने जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या मिशन आरंभ परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला तर २४ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेची गुणवत्ता अधोरेखीत केली.**

पिंपरी जलसेन शाळेतील इयत्ता चौथी व इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली. मागील वर्षीही या शाळेच्या २५ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकाविले होते.

यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांचे पालक, मार्गदर्शक शिक्षक शारदा तांबे, प्रियंका हजारे, सिंधू वाघ, मंगला हराळ, मल्हारी रेपाळे, जयप्रकाश साठे, प्रशांत दिघे, सतीश भालेकर, मुख्याध्यापक पांडूरंग पवार, व्यवस्थापन समिती सदस्या वर्षा पठारे, संजीवनी भालेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप अडसरे, केंद्र प्रमुख दौलत येवले, सरपंच सुरेश काळे, शिक्षण विस्तार अधिकारी रावजी केसकर, गटशिक्षणाधिकारी सीमा राणे यांनी अभिनंदन केले.



पिंपरी जलसेन येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिशन आरंभ परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.

### यशस्वी विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीतील क्रमांक

इयत्ता सातवी : साई पुजारी १, सोहमराजे बढे ८, साई बढे ११, श्रवण लंके १३, अथर्व हारदे १३, आर्यन ढवळे १६, स्वराली रेपाळे १९, वैष्णवी लंके २१, अथर्व थोरात २३, आर्या थोरात २३, साई खोडदे २३, प्रणाली औटी २४, अचुत्यानंद सोनुळे २५, श्रावणी वाळुंज २५, राधिका ढवण २५, पुजा दगाबाज २५, अनुज तांबे २७, श्रावणी वाळुंज २८, यश मंचरे २९, ईश्वरी घेमूड ३०, वैष्णवी गुंड ३०, सिध्दी ठुबे ३१, तनिष्का औटी ३१, इयत्ता चौथी : निनाद पुजारी १२.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com